नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ३ रे<br>Year - 3rd | अंक - ३१<br>Issue - 31 | वार मंगळर दि. १७ जून २०२५<br>Blow- Tuesday Date 17 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# आर्थिक मदतीशिवाय दहशतवादी हल्ला होऊ शकत नाही

## पहलगाम दहशवादी हल्ल्यावरुन एफटीएफएने पाकला फटकारलं, भारताच्या दाव्याला समर्थन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : संयुक्त राष्ट्राची दहशतवाद विरोधी संस्था द फायनान्शिअल ॲक्शन टास्क फोर्सनं पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला आहे. एफटीएफएने म्हटलं की असे हल्ले पैसे आणि दहशतवाद्यांच्या समर्थकांमधील देवाण घेवाणीच्या साधनांशिवाय होऊ शकत नाहीत. जम्मू काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यात पहलगाममध्ये काश्मीरच्या बैसरण घाटीत २२ एप्रिलला पर्यटकांवर दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. त्यामध्ये २६ पर्यटकांनी जीव गमावला होता. भारतानं या हल्ल्याचा बदला ऑपरेशन सिंदूर राबवत घेतला होता. भारतानं पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी ठिकाणांवर हल्ले केले होते.

भारतानं ऑपरेशन सिंदूर राबवल्यानंतर पाकिस्तानकडून हल्ल्याचे प्रयत्न करण्यात आले होते. भारताच्या संरक्षण दलांनी ते हल्ले परतवून लावले होते. त्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये १० मे रोजी शस्त्रसंधी करण्यात आली होती.



एफटीएफएने म्हटलं की असे दहशतवादी हल्ले फक्त बंदुका आणि दारुगोळ्याच्या मदतीनं होत नाहीत. याच्या पाठीमागं खोलवर रुजलेलं संघटित आर्थिक नेटवर्क असतं. त्या पैशांच्या आधारे दहशतवादाला जीवंत ठेवलं जातं. एफटीएफएने टेरर फंडिंग रोखण्यासाठी रुपरेषा तयार करुन विविध देशांकडून त्याचा वापर करण्यावर लक्ष केंद्रीत करण्यास सांगितलं आहे. जोपर्यंत दहशतवादाकडे हा पैसा जात राहील तोपर्यंत दहशतवादाचा चेहरा बदलत राहील.

गेल्या अनेक वर्षांपासून एफटीएफएने जगभरातील २०० देशांना दहशतवादाचा आर्थिक पुरवठा रोखण्यासाठी मार्गदर्शक सूचना देत आहे. ज्यामध्ये बँकिंग सिस्टीम वर नियंत्रण, सोशल मीडिया, क्राऊड फंडिंग किंवा क्रिप्टो करन्सी सारख्या नव्या मार्गांच्या दुरुपयोगासंदर्भातील इशाऱ्यांचा समावेश आहे.

ब्रिक्स संसदीय फोरमकडून पहलगाम हल्ल्याचा निषेध

गेल्या काही दिवसांपूर्वी ब्रिक्सच्या संसदीय फोरममध्ये पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यात आला. याशिवाय दहशतवादाविरोधातील लढाईत झिरो टॉलरन्स धोरण आणि जागतिक एकतेच्या आवश्यकतेवर सहमती दर्शवली गेली.

ब्रासीलियामध्ये आयोजित केलेल्या ११ व्या ब्रिक्स संसदीय फोरममध्ये भारतासह १० देशांच्या खासदारांची भागिदारी असणं भारतासाठी फायदेशीर होतं. भारत, ब्राझील, रशिया, चीन, दक्षिण आफ्रिका, इराण, संयुक्त अरब अमिरात, मिस्त्र, इथियोपिया आणि इंडोनेशियाच्या शिष्टमंडळाचा समावेश होता. या खासदारांनी चर्चेत सहभाग घेतला आणि संयुक्त स्वरुपात घोषणापत्र तयार केलं गेलं.

# यंदाही वारकऱ्यांना टोलमाफी, पंढरपूर पालखी मार्गावर टोल नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : गेल्या वर्षी प्रमाणे यंदाही पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना टोलमाफी देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. आषाढी वारीच्या निमित्ताने १८ जून ते १० जुलै दरम्यान ही टोलमाफी असणार आहे. पंढरपूरला जाणाऱ्या १० मानाच्या पालखी मार्गावर ही टोलमाफी असणार आहे. याचा लाभ वारकरी, मानाच्या पालख्या आणि भाविकांना मिळणार आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने या संबंधित एक परिपत्रक जारी केलं आहे. त्यामध्ये पंढरपूरला जाणाऱ्या जड आणि हलक्या वाहनांना टोलमाफीचा फायदा मिळणार आहे. त्यासाठी गाडी क्रमांक, चालकाचे नाव नोंद करून त्याचे स्टिकर्स परिवहन विभाग, पोलिस किंवा आरटीओ यांच्याकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

आगामी सन २०२५ च्या आषाढी वारीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या पालख्या तसेच भाविकांच्या व वारकऱ्यांसाठीच्या सोयी-सुविधा, त्यांचे वाहनांना पथकरातून सूट देणे, तसेच वारी मार्गावरील रस्ते दुरुस्ती या विषयाच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली दि. २८ मे, २०२५ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे चर्चा होऊन मा. मुख्यमंत्री महोदयांनी विविध विभागांना त्या अनुषंगाने सुचना व निर्देश दिले आहेत, त्यास अनुसरुन सर्व संबंधितांना या सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे पुढीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे:-

पंढरपूरला जाणाऱ्या पालख्या, भाविक व वारकऱ्यांना आषाढी एकादशी २०२५, गाडी क्रमांक, चालकाचे नाव असा मजकूर नमूद करुन आवश्यक त्या संख्येनुसार स्टीकर्स परिवहन विभाग, वाहतूक पोलीस / पोलीस, संबंधीत आर.टी.ओ. यांचेशी समन्वय साधून पोलीस स्टेशन्स, वाहतूक पोलीस चौक्या व आर.टी.ओ. ऑफीसेस मध्ये उपलब्ध करुन द्यावेत. पंढरपूरला जातेवेळी व परत पंढरपूरहुन येतेवेळी दिनांक १८.०६.२०२५ ते १०.०७.२०२५ या कालावधीत ही सवलत पालख्या, भाविक व वारकऱ्यांच्या हलक्या व जड वाहनांसाठीच असेल, अशा सूचना दिल्या आहेत. तसे स्टीकर्स / पास वर नमूद करण्यात यावे. सदरचे पास परतीच्या प्रवासाकरिता ग्राह्य धरण्यात येतील



याप्रमाणे स्टीकर्स तयार करण्यात यावेत. (नमूना सोबत जोडला आहे.) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांनी याबाबत सर्व पोलीस अधिकाऱ्यांना गृह विभागामार्फत अवगत करण्याबाबत सुचना दिल्या आहेत.

सर्व पथकर नाक्यांवर स्वतंत्र पोलीस यंत्रणा ठेवावी. तसेच परिवहन विभागास देखील जादा बसेस गाड्या सोडण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. वाहतूक सुरळीत राहण्याच्या दृष्टीकोनातून हाय सेक्युरिटी पेट्रोलिंग मार्फत पथकर नाक्यांजवळ पोलींसाची व्यवस्था करावी. सार्वजनिक बांधकाम विभाग , महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत, डेल्टा / फोर्स जास्त संख्येने तैनात करण्याचेही निर्देश दिले आहेत.

आपत्कालीन स्थितीचा सामना करण्यासाठी मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग तसेच राज्यातील इतर सर्व संबंधित रस्ते / महामार्गावर रुग्णवाहीका व क्रेनची व्यवस्था करण्यात यावी. मुंबई-कोल्हापूर-बंगलोर, पुणे-सोलापूर, इ. राष्ट्रीय मार्गावर सुद्धा क्रेनची व्यवस्था करण्याचे निर्देश सर्व संबंधित अधिकाऱ्यांना त्वरीत कळविण्याचे आदेश दिले आहेत. यासह विविध सूचना सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

### उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचे निर्देश

# पॉलिटेक्निक अभ्यासक्रमासाठी अर्ज सादर करणास मुदतवाढ

मुंबई : राज्यातील प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांमधील पदविका (पॉलिटेक्निक) प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय वाढली आहे. आजपर्यंत १ लाख २८ हजार १०२ उमेदवारांनी नोंदणी केली असून, यापैकी १ लाख १० हजार विद्यार्थ्यांनी शुल्क भरणा करून अर्ज सादर केले आहेत.

विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद आणि प्रमाणपत्रे मिळण्यात होणारा उशीर लक्षात घेता, विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेपासून वंचित ठेवू नये म्हणून अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्यात यावी, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत.



या निर्णयानुसार अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत, आता २६ जून २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. यासंदर्भातील सविस्तर वेळापत्रक, प्रवेश प्रक्रियेचा तपशील आणि अर्ज सादरीकरणासाठी आवश्यक माहिती https://dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचेही मंत्री पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

### पंढरीची वारी... १८ अन् १९ जूनला प्रस्थान

# संत ज्ञानेश्वर अन् तुकाराम महाराजांच्या पालखीचे वेळापत्रक जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पावसाळ्याला सुरुवात होताच विठुरायांच्या भक्तांना ओढ लागते ती पंढरीच्या पांडुरंग भेटीची. आषाढी एकादशीच्या वारीत पाऊले चालती पंढरीची वाट, माऊली.. माऊली... म्हणत मार्गक्रमण करण्याची. राज्याच्या कानाकोपऱ्यातून पंढरीच्या वारीसाठी हजारांहून अधिक दिंड्या येतात. तर, मानाच्या १० पालख्यांसह हजारो वारकरी भक्तीत तल्लीन होऊन विठुनामाचा गजर करत असतात. ऊन, पाऊस, वादळ, वारा कशीचीही तमा न बाळगता आपल्या लाडक्या बा विठ्ठलाच्या भेटीची ओढ घेऊन पुढे चालत असतात. यंदा ६ जुलै रोजी आषाढी एकादशी असून त्यासाठी वारकऱ्यांची पायी वारी सुरू झाली आहे.

पंढरीच्या वारीसाठी महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातून येणाऱ्या मानाच्या पालख्यांमध्ये देहू येथून जगदगुरू संत तुकाराम महाराज आणि आळंदी येथून संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी येते. आता, या दोन्ही पालख्यांची प्रस्थान, आगमन आणि पंढरीतून परतीच्या प्रवासाचे वेळापत्रक जारी करण्यात आलं आहे. त्यानुसार, अनुक्रमे १८ आणि १९ जुलै रोजी संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांचे पंढरीकडे प्रस्थान होत आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज पायी सोहळा वेळापत्रक :-






१९ जून माऊली पालखी प्रस्थान आळंदी ( प्रस्थान गुरुवारी आल्यामुळे संध्याकाळी आठ वाजता प्रस्थान होणार )

२० जून आळंदी ते पुणे, २१ जून पुणे मुक्काम २२ जून पुणे ते सासवड,( दिवेघाट वारकरी खेळ ) २३ जून सासवड मुक्काम २४ जून सासवड ते जेजुरी, ( भंडाऱ्याची उधळण ) २५ जून जेजुरी ते वाल्हे, (जेजुरी खंडोबा दर्शन ) २६ जून वाल्हे ते लोणंद,(माऊलींना निरास्मान व सातारा जिल्हा प्रवेश) २७ जून लोणंद ते तरडगाव २८ जून तरडगाव ते फलटण २९ जून फलटण ते बरड ३० जून बरड ते नातेपुते (सोलापूर जिल्हा प्रवेश व बरड येथे गोल रिंगण) ०१ जुलै नातेपुते ते माळशिरस (सदाशिवनगर येथे गोल रिंगण) ०२ जुलै माळशिरस ते वेळापूर (खुडूस येथे गोळ रिंगण) ०३ जुलै वेळापूर ते भंडी शेगाव (ठाकूर बुवा समाधी गोल रिंगण आणि टप्पा येथे बंधू भेट सोहळा) ०४ जुलै भंडी शेगाव ते वाखरी (बाजीराव विहीर येथे उभे रिंगण) ०५ जुलै वाखरी ते पंढरपूर, प्रवास व पौर्णिम पर्यंत पंढरपूर मुक्काम वाखरी येथे गोल रिंगण ०६ जुलै देवशयनी आषाढी एकादशी १० जुलै पंढरपुरातून आळंदीकडे परतीचा प्रवास

संत तुकाराम महाराज पायी सोहळा वेळापत्रक २०२५ :- १८ जून : प्रस्थान इनामदार वाड्यात मुक्काम

१९ जून :देहू निगडी आकुर्डी प्रवास व आकुर्डी मुक्काम २० जून: आकुर्डी ते पुणे नाना पेठ मुक्काम २१ जून :निवडुंगा विठ्ठल मंदिर पुणे मुक्काम २२ जून: पुणे हडपसर लोणी काळभोर प्रवास आणि मुक्काम २३ जून :लोणी काळभोर ते यवत प्रवास व मुक्काम २४ जून :यवत वरवंड चौफुला प्रवास व मुक्काम २५ जून : वरवंड ते उंडवडी गवळ्याची प्रवास **(पान २ वर...)**



## संपादकीय....

### ‘एफटीएफए’चा निषेध

गेल्या अनेक वर्षांपासून एफटीएफएने जगभरातील २०० देशांना दहशतवादाचा आर्थिक पुरवठा रोखण्यासाठी मार्गदर्शक सूचना देत आहे. ज्यामध्ये बँकिंग सिस्टीमवर नियंत्रण, सोशल मीडिया, क्राऊड फंडिंग किंवा क्रिप्टो करन्सी सारख्या नव्या मार्गांच्या दुरुपयोगासंदर्भातील इशाऱ्यांचा समावेश आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी ब्रिक्सच्या संसदीय फोरममध्ये पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यात आला. याशिवाय दहशतवादाविरोधातील लढाईत झिरो टॉलरन्स धोरण आणि जागतिक एकतेच्या आवश्यकतेवर सहमती दर्शवली गेली. ब्रासीलियामध्ये आयोजित केलेल्या ११ व्या ब्रिक्स संसदीय फोरममध्ये भारतासह १० देशांच्या खासदारांची भागिदारी असणं भारतासाठी फायदेशीर होतं. भारत, ब्राझील, रशिया, चीन, दक्षिण आफ्रिका, इराण, संयुक्त अरब अमिरात, मिस्त्र, इथियोपिया आणि इंडोनेशियाच्या शिष्टमंडळाचा समावेश होता. या खासदारांनी चर्चेत सहभाग घेतला आणि संयुक्त स्वरुपात घोषणापत्र तयार केलं गेलं. एफटीएफएने म्हटलं की असे दहशतवादी हल्ले फक्त बंदुका आणि दारुगोळ्याच्या मदतीनं होत नाहीत. याच्या पाठीमागं खोलवर रुजलेलं संघटित आर्थिक नेटवर्क असतं. त्या पैशांच्या आधारे दहशतवादाला जीवंत ठेवलं जातं. एफटीएफएने टेरर फंडिंग रोखण्यासाठी रुपरेषा तयार करुन विविध देशांकडून त्याचा वापर करण्यावर लक्ष केंद्रीत करण्यास सांगितलं आहे. जोपर्यंत दहशतवादाकडे हा पैसा जात राहील तोपर्यंत दहशतवादाचा चेहरा बदलत राहील. संयुक्त राष्ट्राची दहशतवाद विरोधी संस्था द फायनान्शिअल ॲक्शन टास्क फोर्सनं पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला आहे.

# छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय पत्रकार भवन बांधण्यासाठी शासन जागा उपलब्ध करुन देणार : सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

## पत्रकार संघाचे रौप्य महोत्सवी अधिवेशन ऐतिहासिक झाल्याने मराठवाड्यातील पत्रकारांना मिळाली नवसंजीवनी

**■ भारतीय माध्यम क्षेत्र अधिक सक्षम झाले पाहिजे – मंत्री अतुल सावे**

**■ राज्यकर्ते आणि प्रसार माध्यम यांचे संबंध अंबडगोड असले तरच लोकशाही टिकून राहील – राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे**

**■ पत्रकार संघटना ही पत्रकारांना आधार देण्यासाठीच – प्रदेश संघटक संजय भोकरे**

**■ परिसंवादातून दिग्गज वक्तव्यांनी मांडली परखड मते, विभागीय अधिवेशनाला राज्यभरातील पत्रकारांची उपस्थिती !**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर / कुंडलिक वाळेकर :

मराठवाड्याचे विभागीय केंद्र असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथे ज्या प्रकारे सर्व शासकिय कार्यालये आहेत. त्याच पध्दतीचे एक विभागीय पत्रकार भवन बांधण्यासाठी शासन जागा उपलब्ध करुन देईल आणि ते बांधून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करू असे आश्वासन राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी दिले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या मराठवाडा विभागाच्या वतीने संत एकनाथ रंगमंदिर येथे झालेल्या भव्य दिव्य अशा रौप्य महोत्सवी विभागीय अधिवेशनामध्ये सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी ही महत्वपुर्ण घोषणा केली. तर पत्रकारांनी केलेले वार्तांकन वाचकांच्या ज्ञानात नेहमीच भर घालणारे असल्याने भारतीय माध्यम क्षेत्र अधिक सक्षम झाले पाहिजे अशी अपेक्षा मंत्री अतुल सावे यांनी व्यक्त केली. तर राज्यकर्ते आणि प्रसार माध्यम यांचे संबंध जर अंबड गोड असले तरच खऱ्या अर्थाने लोकशाही टिकून राहील असे परखड मत पत्रकार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे यांनी व्यक्त केले. आणि पत्रकारांना आधार देण्यासाठीच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटना कार्यरत असल्याचे मत पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रदेश संघटक संजय भोकरे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे रौप्य महोत्सवी विभागीय अधिवेशन छत्रपती संभाजी नगर येथील संत एकनाथ रंगमंदिर उस्मानपुरा येथे रविवार दिनांक १५ जून २०२५ रोजी थाटामाटात संपन्न झाले. या अधिवेशनाच्या पहिल्या सत्रातील परिसंवादाचे उद्घाटन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी माध्यमांचा डी एन ए कोणता ? या विषयावरील हा परिसंवाद देशपातळीवर गाजावा अशा पद्धतीने सादर झाला. या परिसंवादामध्ये सहभागी झालेले संभाजीनगर येथील ज्येष्ठ पत्रकार मधुकर अण्णा वैद्य,एबीपी माझाच्या संपादिका सरिता कौशिक, नवी दिल्ली येथील पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे,पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे,प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे,अँड. महेश भोसले, माजी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे या विचारवंतांना बोलत करणाऱ्या परिसंवादाच्या संवादिका अश्विनी सातव – डोके यांनी परिसंवादामधून विचारांचे मंथन रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारे व्यक्त केले.

या बहारदार ऐतिहासिक रौप्य महोत्सवी विभागीय अधिवेशनाला सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट,राज्याचे इतर मागास बहुजन कल्याणमंत्री ना.अतुल सावे, आ.संजय किणीकर,आ.प्रदिप जयस्वाल, मा. महापौर नंदकुमार घोडेले,संभाजीनगरचे मनपाचे आयुक्त जी.श्रीकांत,प.पू.१००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे अध्यक्ष ना.जयदिप कवाडे, ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे संस्थापक संजय भोकरे, एबीपी माझाच्या संपादक सरीता कौशिक, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, पत्रकार संघाचे माजी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे,प्रदेश सरचिटणीस डॉक्टर विश्वासराव आरोटे प्रदेश समन्वयक नितीन शिंदे प्रदेश प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव, प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमानी प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे संभाजीनगरचे ज्येष्ठ पत्रकार मधुकर अण्णा वैद्य निवड समितीचे अध्यक्ष रुपेश प्रमुख महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे ब्रँड अँबेसिडर संजय फुलसुंदर नाशिक विभागीय संपर्कप्रमुख विजय शेळके मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत छत्रपती संभाजी नगरचे जिल्हाध्यक्ष डॉक्टर छबुराव टाके दिव्य लोकप्रभाचे संपादक ज्येष्ठ पत्रकार संतोष मानूरकर मराठवाडा संपर्कप्रमुख कुंडलिक वाळेकर आदिंची सत्कारमूर्ती ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, संपादक शेख मुजीब आदींची प्रमुख उपस्थिती होती.

मराठवाडा भुषण पुरस्कार वितरण समारंभात प्रास्ताविक करताना मराठवाडा विभागीय अध्यक्ष तथा ज्यांच्या संकल्पनेतून आणि अथक परिश्रमातून हे नेत्रदिपक अधिवेशन संपन्न झाले ते संपादक अनिल सावंत यांनी आपल्या भाषणात सांगितले की, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई ही तमाम पत्रकारांची मातृसंस्था असून या संस्थेच्या निर्मितीला २५ वर्ष पुर्ण झाल्याबद्दल पहिले विभागीय अधिवेशन घेण्याचा मान पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या आग्रहास्तव संतभूमी असलेल्या मराठवाड्याला मिळाला. या विभागातील सर्व जिल्हा संस्थांच्या पदाधिकार्यांनी अधिवेशन यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. त्याबद्दल अनिल सावंत यांनी सर्वांचे आभार मानले. ते आपल्या प्रास्ताविकात म्हणाले,पत्रकारांनी समाजातील फक्त दोष पाहून चालणार नाही. तर चांगले काम करणार्या व्यक्ती आणि संस्थांना लेखनीचे बळ दिले पाहिजे. याच उद्देशाने मराठवाडा भुषण पुरस्काराचे वितरण आम्ही करत असल्याचे सावंत यांनी सांगितले.

या कार्यक्रमात बोलतांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे यांनी पत्रकारांचे सामाजिक दायित्व काय आहे ? या विषयी सखोल मार्गदर्शन केले. लेखनीच्या माध्यमातून असे कार्य करा ज्यामुळे तुमच्या पुढच्या पिढीला निरंतर प्रेरणा मिळत राहिल.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ हा पत्रकारांचे प्रश्न सोडवण्याचे काम तर करतच आहे. त्याच बरोबर वृत्तपत्र क्षेत्राशी संबंधित प्रत्येक घटकाला या संघटनेने कायम आधार दिलेला आहे. कोरोना काळात या पत्रकार संघाने जे काम केले त्याची शासनाने सुध्दा दखल घेतल्याचे संजय भोकरे यांनी सांगितले. राजकिय नेत्यांच्या कामाचे मुल्यमापन करताना ज्या वेळी आपण त्यांचे दोष दाखवतो तेव्हा त्यांनी या क्षेत्रात केलेल्या संघर्षाचा आणि दिलेल्या योगदानाचा विचार सुध्दा पत्रकारांनी केला पाहिजे असे ते म्हणाले. छत्रपती संभाजीनगर येथे अत्यंत उत्कृष्ट असे विभागीय अधिवेशन घेतल्याबद्दल संजय भोकरे यांनी पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांचे विशेष कौतुक करत प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे,विभागीय अध्यक्ष अनिल सावंत, जिल्हाध्यक्ष डॉ. छबुराव ताके आणि सर्व टीमचे विशेष अभिनंदन केले.

या कार्यक्रमात बोलतांना ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएनचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे यांनी राज्यकर्ते आणि प्रसार माध्यम यांचे संबंध अंबटगोड असले पाहिजेत तरच लोकशाही टिकून राहिल असे सांगितले. हे संबंध अधिक गोडही असू नयेत आणि अधिक अंबटही असू नयेत. आजकाल अनेक राजकिय नेते हे पत्रकारांची आम्हाला भिती वाटते असे बोलत असतात. वास्तविक भिती वाटेल असे जर आपण काहीच केले नाही तर पत्रकारांनाच काय ? कोणालाही घाबरण्याचे कारण नसते असेही वानखेडे म्हणाले. जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावरच्या अनेक विषयांवर त्यांनी अभ्यासपुर्ण विवेचन केले.

प.पू.१००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज यांचे मौनव्रत असल्यामुळे त्यांच्या वतीने श्री.स्वामी विवेकानंद शास्त्री यांनी अत्यंत अभ्यासपुर्ण आणि दिलखुलास असे मनोगत व्यक्त केले. आ.संजय किनीकर, मुंबई येथून खास अधिवेशनासाठी आलेल्या एबीपी माझाच्या संपादिका सरिता कौशिक यांनीही परखडपणे आपले मनोगत व्यक्त केले.

या प्रसंगी पुढे बोलतांना राज्याचे मंत्री अतुल सावे म्हणाले की, अलिकडच्या काळात पत्रकारांशी आमचा दररोज संवाद असतो. कधी कधी दिवसातून तीन–चार वेळा पत्रकारांच्या प्रश्नांना सामोरे जावे लागते. लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून पत्रकारांविषयी नेहमीच आदर राहिलेला आहे. माझ्या वडिलांनी आम्हाला दररोज वृत्तपत्र वाचन करण्याची सवय लावली. तेच संस्कार आम्ही आमच्या पुढच्या पिढीवर सुध्दा करत आहोत. या माध्यमातून माहिती बरोबरच आपल्या ज्ञानात सुध्दा भर पडते असे ते म्हणाले. पत्रकार संघाच्या विभागीय अधिवेशनाला त्यांनी मनस्वी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी पुढे बोलतांना सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट म्हणाले की, गेली ४२ वर्ष मी राजकारणात आहे. मंत्रीपदापर्यंत पोहचण्यासाठी जे कष्ट करावे लागले, परिश्रम घ्यावे लागले, संघर्ष करावा लागला तो पत्रकारांनी जवळून पाहिला पाहिजे. पत्रकारांना सुध्दा असेच खडतर आयुष्य जगावे लागते. प्रामुख्याने वृत्तवाहिन्यांच्या पत्रकारांची अवस्था कधी कधी पहावत नाही. कुटुंबाला वेळ न देता,तहान,भुक हरवून हे लोक २४ तास बातमीसाठी काम करत असतात. छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी एक विभागीय पत्रकार भवन असावे या मागणीची दखल घेवून ना.शिरसाट यांनी शासनामार्फत जागा उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन तर दिलेच शिवाय हे अद्यावत विभागीय पत्रकार भवन बांधून देण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करेल असा शब्द देखील तमाम मराठवाड्यातील आणि राज्य स्तरातून आलेल्या पत्रकारांच्या समक्ष दिला.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विद्यापीठाचे प्रसिद्धी प्रमुख संजय शिंदे आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांनी बहारदारपणे करत कार्यक्रमाची उंची वाढवली. तर पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉक्टर विश्वासराव आरोटे यांनी पत्रकार संघाच्या सामाजिक दायित्वाचे विस्तृत वर्णन करत पत्रकार संघटना ही पत्रकारांच्या सुखदुःखामध्ये सहभागी होणारी एकमेव संघटना असून सातत्याने सामाजिक उपक्रम राबवणारे संघटना असल्याचे स्पष्ट घरात मराठवाडा विभागीय अधिवेशन यशस्वी केल्याबद्दल पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, विभागीय अध्यक्ष अनिल सावंत यांच्या टीमचे कौतुक करत या कार्यक्रमाला उपस्थित राहिलेल्या व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचे आणि व्यासपीठाच्या समोर उपस्थित असलेल्या पत्रकार संघाच्या तमाम पदाधिकारी, सदस्य, राज्यभरातून आलेले पत्रकार बांधव भगिनी, पत्रकार प्रेमी नागरिकांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

हे अधिवेशन यशस्वी करण्यासाठी छत्रपती संभाजीनगरचे शहराध्यक्ष देवीदास कोळेकर,जिल्हा उपाध्यक्ष भांबर्डे, मराठवाडा सल्लागार विलास इंगळे,सह सचिव मनोज पाटणी, सचिव महेंद्र डेंगळे,प्रसिध्दी प्रमुख सचिन अंभोरे, संपर्क प्रमुख सुजीत ताजणे,सह सचिव रविंद्र लांडगे, ज्ञानेश्वर तांबे,संतराम मगर,आनंद अंभोरे, माधव खिल्लारे, गोपाळजी पटेल,लक्ष्मीनारायण राठी, राजू परदेशी आदिंनी परिश्रम घेतले.

संत एकनाथ रंगमंदिर येथे संपन्न झालेले पत्रकारांचे हे विभागीय अधिवेशन न भुतो न भविष्यती अशा स्वरुपाचे होते. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या स्थापनेला २५ वर्ष पुर्ण झाल्या नंतर मराठवाडा विभागामध्ये होणारे पहिले हे रौप्य महोत्सवी अधिवेशन आयोजित करण्यात आले होते.



### मराठवाडा भूषण २०२५ या पुरस्काराचे हे ठरले मानकरी...

**मराठवाड्यातील विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणार्या मान्यवरांना मराठवाडा भुषण पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. यामध्ये वरिष्ठ सनदी अधिकारी जी.श्रीकांत, छत्रपती संभाजीनगर भाजपाचे शहराध्यक्ष किशोर शितोळे, सा.बां.विभागाचे पुणे येथील मुख्य अभियंता अतुल चव्हाण, चंद्रसेन कोठावळे, जयंती कठाळे, चला हवा येऊ द्या मधील प्रसिद्ध हास्य अभिनेता योगेश शिरसाट,प्रशांत गिरी, अशोक देशमाने, बीड येथील सायं दैनिक सिटीजनचे संपादक शेख मुजीब,अरुण पवार, हनुमंत भोंडवे, मधुकर अण्णा वैद्य, लातूर येथील ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, सचिन चपळगावकर, शिवराज बिचेवार,आशा शेरखाने, कटके,गणेश गायकवाड,प्रशांत गिरे, सुनिल देवरा,बी.एस.स्वामी,मधुकर सावंत,राजेंद्रसिंह सुर्यवंशी यांना व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते मराठवाडा भूषण २०२५ या मानाच्या पुरस्काराने सन्मानपूर्वक गौरवण्यात आले.**

### पत्रकार संघाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांना उत्कृष्ट संघटक पुरस्काराने केले सन्मानित...

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या पदाधिकार्यांना उत्कृष्ट संघटक पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. यामध्ये दशरथ चव्हाण (नवी मुंबई), दत्ता घाडगे (अहिल्यानगर), भगवान चंदे (ठाणे), राजेंद्र कोरडे पाटील(सोलापुर), स्वामीराज गायकवाड, नयन मोंढे (अमरावती), राकेश खराडे(रायगड), किशोर रायसाकडा(जळगाव), जितेंद्रसिंह राजपुत (उत्तर महाराष्ट्र), नितीन शिंदे (पश्चिम महाराष्ट्र), चंद्रकांत पाटील (कोल्हापुर),संजय पडवळ (ठाणे शहर),संजय फुलसुंदर, राहुल फुंद (शिर्डी), गणेश सुरजसे (अकोला), अनुपकुमार भार्गव (वर्धा), लक्ष्मण डोळस (नाशिक), निलेश सोमाणी (वाशिम),दत्तात्रय राऊत(जामखेड) आदिंनाराज्यस्तरीय उत्कृष्ट संघटक पुरस्कार देवून गौरविण्यात आले.**

### ऑगस्ट मध्ये वाशिमला होणार अधिवेशन...

**ज्या प्रमाणे छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने मराठवाडास्तरीय भव्य दिव्य अधिवेशन पार पडले. त्याच पध्दतीने येत्या ऑगस्ट महिन्यात विदर्भ विभागाच्या वतीने वाशिम येथे अशाच पध्दतीचे अधिवेशन घेणार असल्याचे निलेश सोमाणी यांनी जाहिर केले. तसेच या अधिवेशनाला मराठवाड्यासह राज्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी आणि पत्रकारांना देखील निमंत्रीत केले.**

### पत्रकारांचा डीएनए कोणता या विषयावर झालेला परिसंवाद राष्ट्रीय उंची देणारा ठरला ?

**भारतीय पत्रकारांचा डीएनए नेमका कोणता या परिसंवादात जोरदार विचार मंथन झाले.अधिवेशनात सकाळच्या सत्रात अभ्यासू पत्रकार आणि विधीतज्ञांच्या उपस्थितीत परिसंवाद आयोजित करण्यात आला होता.पत्रकारांचा डीएनए कोणता ? या विषयावर झालेल्या परिसंवादात नवी दिल्लीतून आलेले खास पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.अशोक वानखेडे, पत्रकार संघाचे संस्थापक तथा प्रदेश संघटक संजय भोकरे, मुंबईतून आलेल्या खास एबीपी माझाच्या संपादिका सरिता कौशिक, संभाजीनगरचे ज्येष्ठ पत्रकार मधुकर अण्णा वैद्य, प्रसिद्ध विधीज्ञ अॅड.महेश भोसले, पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे आणि माजी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे सहभागी झाले होते. या सर्वांच्या चर्चेतून अत्यंत प्रभावी असे विचारमंथन झाले. ज्याप्रमाणे समुद्र मंथनातून मोती बाहेर निघाले त्या प्रमाणे या विचार मंथनातून पत्रकारांच्या बुध्दी चातुर्याचे मोतीच बाहेर पडत होते.पत्रकारांचे भावविश्व हे राजकारण आणि राजकिय सत्ता एव्हढ्यापुरते मर्यादित न राहता समाजातील खरे प्रश्न,साहित्य,कला, क्रीडा अशा विविध क्षेत्रात विस्तारले गेले पाहिजे. तरच पत्रकारांचा डीएनए हा त्यांच्या कर्तव्याची पुर्तता करु शकेल. ग्रामीण भागातील पत्रकारांची होणारी मुस्कटदाबी,जाहिरातीसाठी विचार स्वातंत्र्यावर होणारे अतिक्रमण, ब्रेकिंग न्युजच्या आणि टिआरपीच्या हव्यासापोटी अपप्रवृत्तींचा वाढलेला प्रादुर्भाव या सर्वच विषयांवर परिसंवादात साधकबाधक मीडियाला दिशा देणारी चर्चा झाली.**

### पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव...

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे रौप्य महोत्सवी मराठवाडा विभागीय अधिवेशन छत्रपती संभाजी नगर येथे घेण्यासाठी पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या या प्रतिसादाला मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत यांच्यासह संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष डॉ. छबुराव ताके, प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, अभयकुमार दांडगे, प्रदेश निवड समितीचे प्रदेशाध्यक्ष रुपेश पाडमुख आदींनी प्रतिसाद देऊन हे अधिवेशन ऐतिहासिक करत यशस्वीरित्या संपन्न केल्याबद्दल पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांनी सर्व टीमचे विशेष कौतुक करत अभिनंदन केले. कार्यक्रम नंतर या टीमवर अक्षरशः अभिनंदनचा वर्षाव झाला.**

### एखाद्या मोठ्या सेलिब्रेटीपेक्षाही संजय भोकरे साहेबांचे व्यक्तीमत्व पत्रकारांना मोहिनी घालणारे ठरले..!

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रदेश संघटक संजय भोकरे यांनी संपुर्ण राज्यात पत्रकारांचे संघटन उभे केले आहे. यामध्ये प्रामुख्याने मराठवाडा हा तर संजय भोकरे साहेबांचा बालेकिल्ला करण्यामध्ये पत्रकार संघाचे माजी मराठवाडा विभागीय अध्यक्ष तथा विद्यमान प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांचे अनमोल योगदान ठरले आहे.छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या अधिवेशनात मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर सह बीड धाराशिव लातूर नांदेड हिंगोली परभणी जालना या आठही प्रत्येक जिल्ह्यातून १०० ते १५० ग्रामीण पत्रकार स्वखर्चाने आले होते. संत एकनाथ रंगमंदिर फक्त पत्रकारांच्या उपस्थितीने भरल्याचे चित्र पहिल्यांदाच प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या समन्वयामुळे पहायला मिळाले. या अधिवेशनामध्ये नामवंत पत्रकारांना पुरस्कार देवून संघटनेने आपले उत्तरदायित्व निभावले. त्यामुळे एकूणच हा सर्व कार्यक्रम संपल्यानंतर संजय भोकरे साहेबांच्या सोबत सेल्फी काढण्यासाठी शेकडो पत्रकारांची अक्षरशः झुंबड उडाली होती. एखाद्या मोठ्या सेलिब्रेटीपेक्षाही भोकरे साहेबांचे व्यक्तीमत्व पत्रकारांना मोहिनी घालत होते.**

### मराठवाड्यातील जिल्हाध्यक्षांचा झाला गौरव...

**पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय रौप्य महोत्सवी अधिवेशन यशस्वी करण्यामध्ये यशस्वी परिश्रम घेणाऱ्या मराठवाड्यातील आठही जिल्हाध्यक्षांचा व्यासपीठावरील मान्यवरांच्या शुभहस्ते गौरव करण्यात आला.यामध्ये प्रामुख्याने छत्रपती संभाजी नगरचे जिल्हाध्यक्ष डॉ. छबुराव ताके, ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष शांताराम मगर, जालना जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष दिगंबर गुजर, परभणीचे जिल्हाध्यक्ष दिलीप माने, हिंगोलीचे जिल्हाध्यक्ष गजानन मगर, नांदेडचे जिल्हाध्यक्ष संग्राम मोरे, उत्तर नांदेडचे जिल्हाध्यक्ष निळकंठ मदने, निवड समिती नांदेडचे किशोर पवार, लातूरचे जिल्हाध्यक्ष तथा राज्याचे उपाध्यक्ष अशोक देडे, धाराशिवचे जिल्हाध्यक्ष धनंजय पाटील, बीडचे जिल्हाध्यक्ष अमजद खान तसेच बीड ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष अँड विनायक जाधव,महिला जिल्हाध्यक्ष आयेशा शेख, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष शेख ताहेर, बीड ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष दीपक काळकुटे,डिजिटल मीडियाचे बीड जिल्हाध्यक्ष अनिल आगुंडे यांच्यासह मराठवाड्यातील सर्व महानगरीचे अध्यक्ष, शहराध्यक्ष, तालुकाध्यक्ष, सर्वप्रमुख पदाधिकाऱ्यांचे व्यासपीठावरील मान्यवरांच्या शुभहस्ते अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या.**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# धनश्री मल्टीस्टेटने अल्पावधीत उमटवला बँकिंग क्षेत्रात वेगळा ठसा : सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे गौरवोद्‌गार

## धनश्री मल्टीस्टेट या वास्तूचे उद्‌घाटन; महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी

धनश्री मल्टीस्टेट बँकेने अल्पावधीतच बँकिंग क्षेत्रात वेगळा ठसा उमटवला असल्याचे गौरव उद्गार सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी काढले आहे. ते आंधळगाव येथे धनश्री मल्टीस्टेट या वास्तूचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते झालेल्या प्रसंगी ती बोलत होते.




व्यासपीठावर सोलापूर जिल्ह्याची माजी पालकमंत्री लक्ष्मण ढोबळे, माजी आमदार राजन पाटील, शिवसेना नेते प्राध्यापक शिवाजीराव सावंत ,चेअरमन शोभाताई काळुंगे, मुख्य कार्यकारी अधिकारी आष्टी शिपोर्गीय सुयोग गायकवाड,

माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील, जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड ,मंगळवेढा निबंध रतनचंद शहा, बँकेचे चेअरमन राहुल शहा ,दामाजींच्या चेअरमन शिवानंद पाटील, माजी आमदार धनाजी साठे सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेची प्रशासकीय अधिकारी कुंदन भोळे

भाजप सोलापूर जिल्हा अध्यक्ष शिक्षकांत चव्हाण दामाजी शुगर चे व्हाईस चेअरमन तानाजी खरात, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते तांबोळी खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष सिद्धेश्वर अवताडे, शिवाजी नागणे ,राष्ट्रवादीचे अँड शिवाजी पाटील, शिवसेनेचे प्राध्यापिता भगत माजी उपनगराध्यक्ष अजित जगताप शिवसेना शिंदे गटाची तालुकाप्रमुख अशोक चौंडे मंगळा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत साळे यांच्या आंधळगाव परिसरातील सर्व सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील पुढे बोलताना म्हणाले की सरकारने नियम घालून दिलेल्या नियमानुसार धनश्री बँकेने कामकाज केले आहे नवीन टेक्नॉलॉजीचा वापर धनश्री बँक करत आहे असून नागरिकांना जलद सेवा मिळत आहेत.

आजपर्यंत दोन हजार कोटी ठेवी केवळ प्राध्यापक शिवाजीराव काळुंगे यांच्यावर असलेल्या विश्वासावर ठेवी ठेवल्या असून कर्ज वाटप देखील योग्य प्रकारे करून शंभर टक्के वसुली देखील केली जात आहे नागरिकांनी अधिक जास्तीचे व्याज घेण्यापेक्षा आपला पैसा कुठे सुरक्षित आहे त्या बँकेत ठेवी ठेवल्या पाहिजेत अशी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले.

राज्य बँक रोखणार नागरी बँका वरील सायबर हल्ले सध्या सायबर गुन्हेगारी कडून बँक ग्राहकाबरोबर बँकांनाही मोठ्या प्रमाणात म्हटले जात आहे त्यामुळे राज्य बँक आणि नागरी जिल्हा बँकेच्या सुरक्षितसाठी सायबर अंड्यापासून वाचवण्यासाठी नवे प्रमाणे केली जाणार आहे सायबर हल्ल्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात शोध घेऊन त्याचे परिणामकारक नियंत्रण करणे आणि तसेच हांडे प्रथम लावणे तसेच संभाव्य धोक्याच्या सूचना बँकांना देण्याची काम या नियंत्रणाच्या माध्यमातून केले जाणार आहे.

आमदार समान अवताडे बोलताना म्हणाली की धनश्री परिवारांनी सुरुवातीचा खडतर प्रवास करत मोठ्या दिमाखात बँक प्राध्यापक शिवाजीराव काळुंगे यांनी नावावर पण आणले हे दुष्काळी भागात बँक सुरू करून आंधळगाव शाखेने ७० कोटी ठेवी ठेवले आहे जे खूप कौतुकास्पद आहे.

धनश्री परिवाहाने नागरिकांचा विश्वास संपादन करून दोन हजार कोटी ठेवी बँकेकडे आहेत ठेवी मिळणे खूप सोपे असून चांगले कर्जदार शोधून त्यांना कर्जही देऊन शंभर टक्के वसुली करणे काय असते ते धनश्री बँकेकडून शिकले पाहिजे योग्य व्यक्तीला कर्ज देऊन १००% वसुली होणे खूपच गरजेचे आहे.

प्राध्यापक शिवाजीराव काळुंखे यांनी सांगितल्याप्रमाणे लवकरच पाणी मिळणार आहे मंगळवेढा उपसा सिंचन योजना ७०० कोटीची असून पहिला टप्पा पूर्ण होत आहे दुसऱ्या टप्प्यापर्यंत टेंडर सुद्धा निघणार आहे अधिकाऱ्यांना काम सुरू करण्याचे आदेश दिले असल्याचे आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले.

धनश्री परिवाराचे संस्थापक प्राध्यापक शिवाजीराव काळुंगे बोलताना म्हणाली की मंगळवेढा तालुक्यातील शेतकऱ्यांना पैसे मिळणे खूप अवघड होते १९९६ स*** धनश्री सुरू करून तालुक्यातील शेतकऱ्यांना वेळोवेळी मदत करत आहोत व धनश्री महिला व मल्टीस्टेट बँकेच्या माध्यमातून अनेक गोरगरीब नागरिकांना मदत करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे केले आहे.

सन १९७२ चा दुष्काळ ही पाहिला असून शेतकऱ्यांना पाणी मिळवण्यासाठी पाणी परिषद स्थापन करून पाणी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत दुष्काळी भागासाठी मंगळवेढा उपसा सिंचन योजना लवकरात लवकर करावीत होण्यासाठी प्राधान्य देऊन पूर्ण करावी असेही आव्हान प्राध्यापक शिवाजीराव काळुंखे यांनी केले आहे. या कार्यक्रमाची प्रास्ताविक राज लक्ष्मी काळुंगे गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राध्यापक शिवाजीराव काळुंखे यांनी मांडले आहेत व या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष मिसाळ व इंग्रज घुले यांनी केले आहे.

---

# ज्येष्ठ समाजसेवक नानासाहेब कदम यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर येथील शिवप्रेमी तरुण मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक माननीय नानासाहेब कदम यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी या भागातील तरुण कार्यकर्ते सामाजिक कार्यकर्ते भावी नगरसेवक तुकाराम चव्हाण यांच्या शुभहस्ते फेटा बांधून त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित पैलवान भीमा आप्पा माळी, सुरज बनपट्टे, नवनाथ राऊळ, हरिभाऊ भागानगरे, विशाल धोत्रे, बहुसंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येत उपस्थित होते नानासाहेब कदम यांचा स्वभाव मनमिळाव व लोकांना सहकार्य करणे समाजसेवे करणे हा त्यांचा पंढरपुरातील सामाजिक चळवळीतील मोठे योगदान त्यांचे आहे त्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात मोठ्या प्रमाणात युवक उपस्थित होते.

# रामपूर विद्यार्थ्यांची बैलगाडीतून मिरवणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : रामपूर ता. उमरगा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. यामध्ये नवागत मुलांचे मान्यवरांच्या शुभ हस्ते प्रथमता स्वागत करण्यात आले. सेल्फी पॉइंट येथे त्यांचा सेल्फी घेण्यात आला त्यानंतर बैलगाडीतून इयत्ता पहिला प्रवेश घेतलेल्या नावागत मुलांची संपूर्ण रामपूर गावातून वरात काढण्यात आली. मान्यवरांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक वितरण करण्यात आले. यावेळी अध्यक्ष हनमंत दासमे, उपाध्यक्ष कुंभार शाळा व्यवस्थापन समिती सदस्य गोविंद भोसले व मान्यवर आणि पालक उपस्थित होते. आज मुलांना शालेय पोषण आहारासोबत सोनपापडी देण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक



स्वामी विकास यांनी केले.आभार गायकवाड बालाजी यांनी मानले. यावेळी श्री शिंदे महादेव, सहशिक्षक भोसले धर्मराज, कांबळे चंद्रशेखर, कांबळे तानाजी,श्रीमती वेल्हाळ स्नेहा, सर्व पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

---



# हरितवारी या उपक्रमांतर्गत १००० ऑप्शनची लागवड; लक्ष्मी टाकळी परिसरात वृक्ष रोखण्याचा कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांच्या संकल्पनेतून सोलापूर ग्रामीण पोलीस हरित वारी या उपक्रमांतर्गत लक्ष्मी टाकळी पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन व इंजिनिअरिंग कॉलेज भोपाळपूर व लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने लक्ष्मी टाकळी शिवारात पहिल्या टप्प्यात एक हजारो रोपांची लागवड केली असून ५ ००० लागवड करण्यात येणार आहे. वृक्षारोपण कार्यक्रमास सेवानिवृत्त पोलीस अधिकारी नाना कदम, हनुमंत माने ,राजेश पाटील , पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी .वाय. मुजावर, सह पोलीस निरीक्षक विश्वास पाटील, सह पोलीस निरीक्षक विभावरी रेळेकर, पोलीस निरीक्षक कवितकर, पोलीस उपनिरीक्षक आमदार सोयरी कॉलेज गोपाळपूरचे विद्यार्थी विद्यार्थिनी सरपंच संजय साठे उपसरपंच संजय कारंडे ग्रामपंचायत सदस्य ग्रामसेवक यांच्या उपस्थितीत सदरचा कार्यक्रम दहा ते अकरा वेळात पार पाडला या कार्यक्रमास विद्यार्थी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोहटा देवी चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित दहावी-बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवीन पनवेल/केतन भोज : मोहटा देवी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने दहावी व बारावी परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.हा कार्यक्रम १५ जून रोजी नवीन पनवेल येथील रोटरी स्कूल हॉल येथे संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात ट्रस्टचे विश्वस्त अजय कापरे यांच्या प्रस्तावनेने झाली.त्यांनी ट्रस्टच्या सामाजिक कार्याची माहिती देत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.या वेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार श्री.बाळाराम पाटील उपस्थित होते.त्यांच्या हस्ते १०० गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.याप्रसंगी बोलताना बाळाराम पाटील म्हणाले,विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम,चिकाटी व सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपले ध्येय गाठावे.अशा सन्मानाने विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा मिळते.तसेच कार्यक्रमा वेळी नवनाथ साबळे माजी गटशिक्षणाधिकारी यांनी मुलांनी मोबाईलचा योग्य तो वापर करावा आणि आपल्या करिअर साठी त्याचा फायदा करावा असे सूचक माहिती यावेळी विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाला भरत जाधव नवी मुंबई महानगरपालिका माजी नगरसेवक,महेश पाटील अध्यक्ष लक्ष्मी पब्लिक स्कूल,जेके कुंभार सर माझी पर्यवक्षक बाठीया स्कूल,सुरेश पाटील माजी मुख्याध्यापक केव्ही कन्या हायस्कूल,विलास फडके माजी जिल्हा परिषद सदस्य पनवेल,प्रकाश म्हात्रे जिल्हाचिटणीस शेकाप,माजी नगरसेविका नीता माळी,अनंत वारे प्रदेश उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पदवीधर सेल,देविदास गायकवाड अध्यक्ष पनवेल प्रेस क्लब,किरण बाथम संपादक डेली टाइम्स ७,पत्रकार सुनील भुजबळ,अण्णासाहेब आहेर आदर्श भारत माझा संपादक,सुरेश भोईर कार्यकारी संपादक दैनिक युवक आधार,विलास गायकवाड उपसंपादक दैनिक युवक आधार,विजय दूंद्रेकर कोकण विभाग प्रमुख दैनिक युवक आधार,आदि उपस्थित होते. कार्यक्रम चे सूत्रसंचालन दिग्दर्शक




विशाल सावंत यांनी केले.व कार्यक्रमाच्या शेवटी बबन बारगजे यांनी उपस्थितांचेआभार मानले.या सोहळ्यास ट्रस्टचे अध्यक्ष संतोष शिवदास आमले,सचिव दिलीप कोकाटे,कार्याध्यक्ष बाळासाहेब गोरे,अजय कापरे,प्रशांत गांगर्डे,बबन बारगजे,अशोक घनवट,अण्णा शिंदे,शरद घुले,बाळा झोडगे, बबन खीळदकर,बाळू शेळके,दादासाहेब घालमे पदाधिकारी,पालक व विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.व कार्यक्रमाला अल्पउपहार प्रशांत गांगर्डे यांच्या वतीने देण्यात आला.कार्यक्रमाचे सुंदर संयोजन मोहटा देवी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने करण्यात आले होते.

---

## पुरंदर तालुक्यातील रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन

## रिपाइंच्या मेळाव्यास नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

# बळीराम सोनवणे हेच तालुका अध्यक्ष : श्रीकांत कदम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : गेले अनेक दिवस पुरंदर तालुक्याचा खरा अध्यक्ष कोण आणि बोगस अध्यक्ष कोण याबाबत पुरंदर तालुक्यात चर्चा सुरु होती, बळीराम सोनवणे यांची धम्म चक्र प्रवर्तन दिन (अशोका दसरा ) या दिवशी माझ्या अधिकारात पुरंदर तालुक्याचे अध्यक्ष म्हणून निवड केली होती, माझी निवड केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केलेली आहे, त्यामुळे त्या अधिकारात मला तालुक्याचे अध्यक्ष निवडीचे अधिकार आहेत त्यानुसार मी बळीराम सोनवणे यांना ती संधी दिली परंतु आज या ठिकाणी या मेळाव्यास पुरंदर तालुक्यातील जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन, बळीराम सोनवणे हेच तालुक्याचे अध्यक्ष आहेत यावर शिक्कामोर्तब केले आहे, त्यामुळे खरा अध्यक्ष कोण व खोटा कोण याचा निकाल पुरंदरच्या जनतेनेच दिला असे मत रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत कदम यांनी व्यक्त केले,

सासवड येथील गावकरी हॉटेल येथे श्रीकांत कदम यांच्या अध्यक्षतेखाली पुरंदर तालुक्यातील रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन केले होते यावेळी कदम बोलत होते,

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशचे जेष्ठ नेते, रोहीदास गायकवाड, रिपब्लिकन पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश महिला आघाडीच्या वरिष्ठ उपाध्यक्षा संगिताताई आठवले, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले, रिपब्लिकन पक्षाचे वरिष्ठ जिल्हा उपाध्यक्ष नरेश डाळींबे दशरथ गायकवाड , जिल्हा संघटक सचिव राजाभाऊ ओव्हाळ भारतीय बौध्दमहासभेचे प्रदेश उपाध्यक्ष भिमराव कांबळे रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे संघटक सचिव गोविंद जगताप,रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष विशाल पाळेकर, रिपब्लिकन पक्षाचे दौंड शहर अध्यक्ष नागेश साळवे जेष्ठ नेते विश्वनाथ जाधव , बारामती तालुका अध्यक्ष संजय वाघमारे, भोर तालुका अध्यक्ष राहुल कांबळे, आण्णा शिंदे अजय शिंदे सचिन शिंदे, वेणिला पवार असिफ शेख रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडच्या महिला आघाडीच्या तालुका अध्यक्षा रोहीणीताई कुंभारकर, उपाध्यक्षा सिमाताई कुंभार सिमाताई बेंगळे, सनी पवार, के. के. लगड, संजय जाधव राहुल कांबळे, स्वप्नील वर्वेकर विवेक मोरे सोमनाथ मासाळ, श्रीधर गायकवाड, सुनिल जगताप, रमेश रणदिवे, केशव रणदिवे, रामकृष्ण वाघमारे, अँड अमोल वाघमारे अनिल कांबळे, अशोक रोकडे, उमेश कांबळे मुळशी तालुका रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे विजय भालेराव, दत्ता सोनवणे, विनोद रणपिसे मनोज भिसे, भिवा वळकुंदे, ज्ञानोबा वाघमारे, तानाजी भालेराव, पुष्पाताई नाईकनवरे, बाळासाहेब पोळ कांचनताई पोळ अक्षय औचरे , मंगेश औचरे पंढरीनाथ औचरे रोहन सोनवणे यांसह विविध पदाधिकारी उपस्थितीत होते यावेळी जेष्ठ रिपब्लिकन नेते रोहीदास बापू गायकवाड महाराष्ट्र प्रदेश महिला आघाडीच्या वरिष्ठ उपाध्यक्षा संगिताताई आठवले, राजाभाऊ ओव्हाळ , नरेश डाळींबे, पंढरीनाथ जाधव बळीराम सोनवणे यांनी विचार व्यक्त केले.




कार्यक्रमाचे आयोजन तालुका अध्यक्ष बळीराम सोनवणे, रिपब्लिकन पारधी आघाडीचे पश्चिम महाराष्ट्र पारधी आघाडीचे अध्यक्ष पुरुषोत्तम पवार, रिकू पवार गौरव भोसले, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष कालीदास उबाळे, युवक अध्यक्ष स्वप्निल पाटोळे, तालुका उपाध्यक्ष सचिन कांबळे, आबा वाघमारे, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे तालुका कार्याध्यक्ष सुधीर शेलार जेजुरी शहर रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे शहर अध्यक्ष रंजित भालेराव, यांनी केले होते, एल एल बी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष अँड सुनिलतात्या धिवार यांचा व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा पुनर्वसन समितीच्या अध्यक्षपदी अविनाश भालेराव यांची निवड झाल्याबद्दल रिपब्लिकन पक्षाच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला, कार्यक्रमाचे प्रास्ताविक विष्णूदादा भोसले यांनी केले तर सुत्रसंचलन स्वप्नील पाटोळे यांनी केले, तर आभार जेष्ठ आंबेडकरी चळवळीतील नेते आनंदराव घोरपडे गुरुजी यांनी केले.

# केंद्र व राज्य शासन शालेय शिक्षणासाठी विद्यार्थ्यांच्या पाठीशी

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे प्रतिपादन; पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या तुंगत येथील शाळेला पालकमंत्र्यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला व उत्साह वाढवला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**पहिलीच्या नवागतांचे बैलगाडीतून मिरवणूक पालकमंत्र्यांनी बैलगाडीचे केले सारथ्य**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आधुनिक शिक्षण प्रणालीच्या माध्यमातून शाळांना मॉडेल बनवण्याचे काम केंद्र व राज्य शासन करीत आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळावे यासाठी शासन शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध योजना, उपक्रम राबवित आहे. विद्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारे शिक्षण मिळावे यासाठी केंद्र व राज्य शासन शालेय शिक्षणासाठी विद्यार्थ्यांच्या पाठीशी आहे, असे प्रतिपादन ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

आज दिनांक १६ जून पासून नवीन शैक्षणिक वर्षाला प्रारंभ झाला आहे.शाळा प्रवेशोत्सवाच्या अनुषंगाने राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या तुंगत येथील शाळेला भेट दिली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम,उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, सरपंच डॉ अमृता रणदिवे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष वामन वनसाळे, यांच्यासह मान्यवर पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.



यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, शाळेची गुणवत्ता वृद्धींगत करण्यासाठी व मुलांची उपस्थिती वाढविण्याकरीता शासनाच्या शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यभर 'शाळा प्रवेशोत्सव' उपक्रम साजरा करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील गोरगरिबांची मुले शिकली पाहिजेत. प्रत्येक मुलाने शाळेत प्रवेश घेतला पाहिजे. जे पालक शिक्षणापासून वंचित आहेत. आर्थिक परिस्थितीमुळे मुले शाळेत पाठवले जात नाहीत अशा पालकांनी आपल्या मुलाला शाळेत पाठविण्यासाठी हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. शाळा चांगल्या असाव्यात म्हणून आदर्श शाळा निर्माण करण्याचे काम शासन करीत आहे. तसेच अनेक शाळेमध्ये डिजिटल शिक्षण देण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे.

शाळेच्या पहिल्याच दिवशी शासनामार्फत मुलांना गणवेश, शूज पाठ्यपुस्तके देत आहे. मुलांना जिल्हा परिषदेच्या शाळेत चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षक उपलब्ध करून देत आहेत. कोणतेही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये तसेच विद्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारे शिक्षण घ्यावे, राज्यातील ग्रामीण भागातील सर्व जिल्हा परिषद शाळांना विद्यार्थ्यांनसाठी सुविधा पुरविण्याचे काम ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे पालकमंत्री श्री गोरे यांनी सांगितले.

तसेच आपल्या सर्वांना अभिमान वाटेल अशी शाळा आणि शिक्षणाचा दर्जा उंचवण्याचं काम तुंगत येथील जिल्हा परिषद शाळेचे आहे. या शाळेने इंजिनियर ,डॉक्टर उच्च अधिकारी बनवण्याचं काम केलं आहे आज या शाळेत ज्या बालकांनी प्रवेश घेतला आहे ती मुले भविष्यात उच्च शिक्षित होतील अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

पहिलीच्या नवागतांचे बैलगाडीतून मिरवणूक पालकमंत्र्यांनी बैलगाडीचे केले सारथ्य.

### पडत्या पावसातही पालकमंत्र्यांनी केले भाषणाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा तुंगत या ठिकाणी प्रवेशोत्सवानिमित्त नवागातांचे स्वागत करण्यासाठी बैलगाडीच्या माध्यमातून व ट्रॅक्टरच्या माध्यमातून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी स्वत: पालकमंत्र्यांनी बैलगाडीचे सारथ्य केलं. तसेच पालकमंत्री यांचे भाषण सुरु असतानाच पाऊसाला सुरुवात झाली. यावेळी पाऊसामुळे काही विद्यार्थ्यांचा चुळबुळ सुरू असताना पालकमंत्री यांनी मुलानो शांत बसा ... हाताची घडी तोंडावर बोट म्हणातच विद्यार्थी एकदम शांत झाले व पडत्या पावसातीही विद्यार्थ्यांनी भाषणाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तत्पुर्वी शाळेत राबविल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती घेत शिक्षक व विद्यार्थ्यांचे मंत्री गोरे यांनी कौतुक करुन विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देवून स्वागत केले.**

---



## अधिकारी व्हायचे असेल तर जि.प.शाळेतच प्रवेश घ्या : उपशिक्षणाधिकारी श्री दत्तात्रय लांडगे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : सुधाकर रणदिवे, ता.१६ तालुक्यातील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा माळकरंजा येथे आज प्रवेशोत्सवाच्या वेळी धाराशिव जिल्हा परिषदचे उपशिक्षणाधिकारी श्री दत्तात्रय लांडगे यांनी वरील मत व्यक्त केले.आपल्या मार्गदर्शनपर भाषणात श्री लांडगे साहेब यांनी सांगितले की खरे शिक्षण हे मातृभाषेतूनच मिळते आणि मातृभाषेतून शिक्षण हे जिल्हा परिषद शाळेतूनच दिले जाते. इंग्रजी माध्यमांच्या शाळा या केवळ देखाव्यापुरत्या असुन खरी गुणवत्ता ही गावातल्या जिल्हा परिषद शाळेतच आहे. जिल्हा परिषद शाळेतील सर्व स्टाफ हा उच्चविभूषित असून गुणवत्तेचे व ज्ञानदानाचे कार्य अतिशय प्रामाणिकपणे पार पाडत आहे. जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा माळकरंजा शाळेची जडणघडण येथील गुरुजनांमुळे आणि पालकांच्या सहकार्यातूनच झालेली आहे याबद्दलही श्री लांडगे यांनी गौरवोद्गार काढले. शाळेत उपलब्ध असलेल्या भौतिक सुविधा व सोयी यांचा आढावा यावेळी मुख्याध्यापक श्री संतोष भोजने यांनी उपस्थितांना करून दिला.मध्यान्ह भोजन योजनेसह विविध शिष्यवृत्ती व लाभाच्या योजनेची माहिती दिली.शाळेत सर्व भौतिक सुविधा उपलब्ध असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आपल्या गावातील शाळेत प्रवेश घ्यावा तसेच पालकांनीही आपल्या मुलींची मुले (नातवांचे) प्रवेश आपल्या या शाळेत घ्यावेत असे आवाहन यावेळी त्यांनी केले.शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना बूट सॉक्स, गणवेश व पाठ्यपुस्तके यांचे वाटप यावेळी उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष तथा उपसरपंच श्री शरद गालट यांनीही शाळेतील शिक्षक वृंद व गुणवत्ता याबद्दल कौतुक करत शाळा आणि शिक्षकांच्या पाठीशी शालेय समिती व ग्रामस्थ ठामपणे उभे असल्याचे सांगितले. कार्यक्रमास सर्वश्री .जरीचंद लोमटे,संतोष कोळी, अशोक कराड, श्रीमंत माने प्रमोद रसाळ रमेश लोमटे, रत्नदीप लोमटे, बिभीशन गोडसे, लक्ष्मण टकले यांच्यासह शाळेतील सहशिक्षक श्री मकरंद नाडे, श्रीमती भारती सूर्यवंशी हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री हनुमंत घाडगे यांनी तर आभार प्रदर्शन श्री शरद गालट यांनी केले.

---

## डुबेरे विद्यालयात नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प व पाठ्यपुस्तके देऊन स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंत नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन ढोल ताशाच्या गजरात विद्यालयमार्फत स्वागत करण्यात आले. इयत्ता पाचवी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकाचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यालयाचे प्राचार्य रंगनाथ उगले यांनी आपल्या प्रास्ताविकात शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांविषयी माहिती देवून मान्यवरांचे स्वागत केले.



बऱ्याच कालावधी नंतर शाळेची घंटा वाजल्याने आज विद्यार्थ्यांची किलबिलाट ऐकू आली. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व उत्साह दिसून येत होता. विद्यार्थी एकमेकाची आस्थेने व प्रेमाने विचारपूस करीत होते. विद्यार्थी गप्पा गोष्टीत रंगले होते .विद्यालयाच्या प्रवेशद्वारावर सडा टाकून रांगोळी काढली होती.

अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष नारायण वाजे होते.व्यासपीठावर सरपंच रामनाथ पावसे, सदस्य भाऊ वारुंगसे, शरद माळी, अरुण वारुंगसे,बबनराव वाजे , कारभारी वारुंगसे,विजय दादा वाजे, वसंतराव जाधव ,प्राचार्य रंगनाथ उगले , पर्यवेक्षक उल्हास पवार आदिंसह पालक उपस्थित होते.यावेळी नारायण वाजे यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. शिक्षक शिकवित असतांना विद्यार्थ्यांनी वर्गात समरस व्हावे. चांगला अभ्यास करून उज्वल यश संपादन करून आई-वडिलांचे व शाळेचे नाव उज्वल करावे असे आव्हान वाजे यांनी केले. विद्यार्थ्यांना शालेय पोषण आंतर्गत मिष्टान्न भोजनाचे वाटप करण्यात आले.

### उज्वल सुयश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार

इयत्ता १२ वी व इयत्ता १० वीच्या परीक्षेत प्रथम पाच क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा भेटवस्तू व गुलाबपुष्प देवून सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते विद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटीच्या अध्यक्षपदी बबनराव वाजे यांची निवड झाल्याबद्दल तसेच तंटामुक्ती गाव समितीच्या अध्यक्षपदी कारभारी वारुंगसे यांची निवड झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचालन पी.आर.करपे यांनी तर आभार पर्यवेक्षक उल्हास पवार यांनी मानले.यावेळी रामदास वारुंगसे,सोमनाथ पगार, सोमनाथ गिरी,ए.रबडे,के. एस.शिंदे, सुनिल ससाणे, रेवणनाथ कंगणे, एस.बी.गुरूळे आदींसह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

---

## भाळवणी येथे हटकर कोष्टी युवक संघटनेच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील हटकर कोष्टी युवक संघटनेच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी गंगाधर कोले होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून जयकुमार कोले, सुरेश कापसे, संजय आंबेकर, माणिक कोले, चंद्रकांत कापसे, मुरलीधर कोले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी धनंजय धोत्रे म्हणाले की विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या नादी न लागता अभ्यासाच्या नादी लागले पाहिजे पालकांनीही आपला मुलगा काय मोबाईलवर पाहत आहे याकडेही लक्ष दिले पाहिजे. यावेळी प्रशांत माळवदे म्हणाले की आपल्या पालकांनी आपल्या मुलाकडे लक्ष दिले पाहिजे मुलगा अभ्यास करतो का याकडेही पहिले पाहिजे. हटकर युवक संघटनेने शालेय विद्यार्थ्यांचा शालेय साहित्य देऊन जो सत्कार केला आहे ती अभिमानाची गोष्ट आहे. संघटनेच्या कार्यास शुभेच्छा ही माळवदे यांनी दिल्या. यावेळी ३१ विद्यार्थीना वह्या, पेन, बाटली, कंपास आदि साहित्याचे वाटप करण्यात आले.



या कार्यक्रमाचे आयोजन बाळासाहेब कापसे यांनी केले होते. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सविता कापसे यांनी केले तर आभार राहुल लंगोटे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष कोले, अशोक शहाणे, हरिदास कापसे,राजू कापसे, तुकाराम कापसे, संतोष कापसे, राहुल कापसे, राजू निराळी, पप्पू कोले यांनी सहकार्य केले.या कार्यक्रमास विद्यार्थी पालक महिला व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

**कुरुडगाव येथुन संस्थेच्या मार्फत विद्यार्थ्यांसाठी बस सेवा सुरू**

**विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ व मिष्टानांचे भोजन देत केले स्वागत**

# स्वा. सावरकर विद्यालय कोठुरे येथे व नवागतांचे बैलगाडीमध्ये बसून गावातुन फेरी काढून उत्साहात स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संचलित स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोठुरे येथे नवीन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ नवागतांच्या स्वागताने उत्साहात साजरे करण्यात आले . ही आवडते मज मनापासून शाळा ,लाविते लळा जसा माऊली बाळा * या उक्ती प्रमाणे नवीन शालेय जीवनात पदार्पण करणारे अर्थात इयत्ता ५वी त दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून व गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर शालेय परिपाठाने व महाराष्ट्र राज्यगीत गायनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून शालेय समिती सदस्य प्रकाश टरले. प्रकाश कोरडे,जितेंद्र पोटे.विष्णू मोगल,निवृत्ती मोगल, डॉ राम दास मोगल, भाऊसाहेब मोगल तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील सातपुते व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीपूजन करण्यात आले.प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक सातपुते सर यांनी शाळेचा पहिला दिवस ,शालेय जीवन त्यातील अनुभव व संस्कारांची शिदोरी ही सर्वात मोठी असते असे सांगितले.

त्यानंतर नव्याने दाखल विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना गुलाबपुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच माध्यमिक शिक्षणाची सुरुवात स्मरणात राहावी यासाठी विद्यार्थ्यांचे सेल्फी काढण्यात आले. विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तकांचे वाटप उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमासाठी सर्वत्र फुले, रांगोळी, पताका लावून शालेय परिसराची सजावट करण्यात आली . त्यानंतर नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची फुग्यांनी सजवलेल्या बैलगाडीवरून गावातून फेरी काढण्यात आली. बैलगाडी साठी सौजन्य भाऊसाहेब मोगल यांचे लाभले.तसेच कुरडगाव गावातील विद्यार्थ्यांसाठी संस्थेच्या मार्फत बस सेवा देखील सुरू करण्यात आली. मध्यान भोजनात विद्यार्थ्यांना मिष्टान्नची सोय शालेय पोषण आहार समितीमार्फत करण्यात आली होती.




सदर कार्यक्रमाचे नियोजन शालेय सांस्कृतिक समिती प्रमुख सुधाकर निकम यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षक किरण भडांगे यांनी केले. कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

---

## संत ज्ञानेश्वर अन् तुकाराम महाराजांच्या...

(पान १ वरून...)

व मुक्काम २६ जून : उंडवडी गवळ्याची ते बारामती प्रवास व मुक्काम २७ जून : बारामती काटेवाडी सणसर पालखीतळ मुक्काम ( काटेवाडी येथे मेंढी बकऱ्यांचे रिंगण )२८ जून : संसर बेलवाडी, निमगाव केतकी प्रवास मुक्काम (बेलवडी येथे पहिले गोल रिंगण) २९ जून : निमगाव केतकी ते इंदापूर प्रवास व मुक्काम (इंदापूर येथे गोल रिंगण ) ३० जून : इंदापूर ते सराटी पालखीतळ प्रवास आणि मुक्काम १ जुलै : सराटी ते अकलूज प्रवास व मुक्काम (अकलूज येथे गोल रिंगण व सोलापूर जिल्ह्यात आगमन) २ जुलै : अकलूज ते बोरगाव प्रवास व मुक्काम (माळीनगर येथे उभे रिंगण ) ३ जुलै : बोरगाव ते पिराची कुरोली प्रवास आणि मुक्काम ४ जुलै : पिराची कुरोली ते वाखरी पालखीतळ मुक्काम (बाजीराव विहीर येथे उभे रिंगण ) ५ जुलै : वाखरी ते पंढरपूर मुक्काम (वाखरी येथे उभे रिंगण ) ६ जुलै : एकादशी नगरप्रदक्षिणा आणि चंद्रभागा स्नान १० जुलै : पंढरपुरातून देहूकडे परतीच्या प्रवासाला सुरुवात